# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

निर्णय क्र. मविनिआ/माअअ/२०२२/अपील/०२/२०२२/०१४९ दिनांक-०८.०४.२०२२

| | |
|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | :२२.१२.२०२१ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | :२१.०१.२०२२ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | :२४.०२.२०२२ |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | :०८.०४.२०२२ |

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

**अपील क्र. ०२/२०२२**

**अपीलकर्ता:** श्रीमती हेमलता प्रमोद मोती

**विरुदध**

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**अपीलाचे तथ्य :-**

१) अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१२.२०२१ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक २२.१२.२०२१ रोजी प्राप्त झाला. अपीलार्थी यांच्या दिनांक २२.१२.२०२१ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत दाखल केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी समाधानकारक माहिती न पुरविल्यामुळे अपीलार्थी यांनी दिनांक २४.०२.२०२२ रोजी वरील अपील दाखल केले. (प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक २४.०२.२०२२ रोजी प्राप्त झाले.)

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक २४.०२.२०२२ रोजी नोटिस पाठवून दिनांक ०२.०३.२०२२ रोजी सुनावणी आयोजीत केली. सुनावणी च्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोन्ही हजर होते. अपिलार्थी यांनी लेखी तसेच मौखिक व माहिती अधिकारी यांनी मौखिक निवेदन सादर केले.



१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

३) अपिलातील दस्तऐवज व निवेदनावरुन अपिलातील मुदद्दे खालील प्रमाणे आहेत -

**मागितलेली माहिती:-**

१) श्रीमती हेमलता प्रमोद मोती यांच्या सुधारित आश्वासित प्रगती योजने अंतर्गत १ ल्या व २ ऱ्या लाभा संदर्भातील संपूर्ण नस्तीची टिपणी सहीत साक्षांकीत प्रती देण्यात याव्यात. (२०१२ ते आजपर्यंत)
२) आयोगाच्या कार्यालयातील यापूर्वी सुधारित आश्वासित प्रगती योजने अंतर्गत ग्रे.पे. ६६००/- ची वेतनश्रेणी मंजूर केलेली आहे त्या अधिकारी/कर्मचारी (प्रतिनियुक्तीवरील सुध्दा) यांच्या सुधारित आश्वासित प्रगती योजने संदर्भातील संपूर्ण नस्तीची टिपणी सहीत साक्षांकीत प्रती देण्यात याव्यात. (२०१२ ते आजपर्यंत)
३) तसेच आयोगाच्या कार्यालयात प्रतिनियुक्तीत असलेल्या ग्रे.पे. ६६००/- वा त्यावरील ग्रे.पे. ७६००/- चे वेतन आहरित करीत असलेल्या अधिकाऱ्यांना शासनाने मंजूर केलेल्या सुधारित आश्वासित प्रगती योजने संदर्भातील आदेशाची साक्षांकित प्रती देण्यात याव्यात. (२०१२ ते आजपर्यंत)
४) दि.२८.०३.२०१८ रोजी मी (हेमलता प्रमोद मोती) विनंती केल्याने ग्रे.पे.५४००/- देण्यासंदर्भात कार्यालयाने केलेल्या कार्यवाही संदर्भातील मंजूर टिपणी आणि मंजूर टिपणीच्या अनुषंगाने मला अवगत केल्याबद्दलचे कार्यालयीन आदेश यांच्या साक्षांकित प्रती देण्यात यावी.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-**

सन २०१२ ते आजतागायत या कालावधीतील माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध आहे. सदर माहिती मोठया प्रमाणात असल्यामुळे आपण आयोगाच्या कार्यालयात येऊन प्रत्यक्ष त्याची तपासणी करावी व आपणांस आवश्यक असलेली कागदपत्रे माहितीचा अधिकार (फी आणि खर्च विनियमन) नियम, २००५ चे कलम ४ मधील खंड (अ) नुसार प्रती पृष्ठ रु.२/- प्रमाणे उपलब्ध करण्यात येईल. **

**टिप :** कार्यालयात तपासणीला येण्यापूर्वी २ दिवस आधी अवगत करावे.

त्यानुषंगाने प्रतिवादी/जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २४.०१.२०२२ रोजी आवश्यक असलेल्या माहितीबाबत आयोगाच्या कार्यालयात, कार्यालयाच्या अभिलेखावरून एकुण ६ फाईल्स उपलब्ध करून दिल्या होत्या, त्यापैकी १ फाईल आश्वासित प्रगती योजना बाबतची आयोगाच्या मंजूरीस्तव नस्ती प्रकरण सादर केलेली असल्याने परिक्षणाकरीता उपब्ध करून देण्यात आलेली नाही, पैकी ५ फाईल्स अपिलार्थी यांना कार्यालयामध्ये दिनांक २७.०१.२०२२ रोजी प्रत्यक्ष हजर राहून सर्व कागदपत्रांची पडताळणी करीता उपलब्ध करून देण्यात आली. त्यांनुसार अपिलार्थी यांनी पडताळणी केलेल्या फाईल्स मधील (एकूण ९४ पृष्ठे) आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विहीत शुल्क भरल्यानंतर दिनांक ०२.०२.२०२२ रोजी उपलब्ध करून देण्यात आल्या.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-**

मुद्दा क्र. १ - दुसऱ्या लाभाबाबत माहिती देण्यात आलेली नाही.
मुद्दा क्र. २ - श्रीमती ॲना पिल्लई यांच्या पहिल्या लाभाबाबत माहिती देण्यात आलेली नाही.
मुद्दा क्र. ३ - श्रीमती रुजुता गाडगीळ यांच्या ACPS बाबत सार्बजनिक बांधकाम विभागाची आयोगाच्या कार्यालयास प्राप्त असलेला दि. ०९.०७.२०२१ रोजीचा आदेशाची प्रत देण्यात आलेली नाही.
मुद्दा क्र. ४ - बाबतची माहिती देण्यात आलेली नाही.

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे :-**

अपीलार्थी यांनी मौखिक व लेखी तसेच प्रतिवादी यांनी नमूद केलेल्या मौखिक व लेखी निवेदनावरून व अपीलातील मुद्द्यावरून असे दिसून येते कि, अपीलार्थी यांना त्यांच्या माहिती अधिकार अर्जाच्या अन्वये या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करून दिलेली आहे.

उर्वरीत एक फाईल जी 'आश्वासित प्रगती योजने' बाबतची आयोगाच्या मंजुरीस्तव नस्ती प्रकरण सादर केलेले असल्याने परिक्षणाकरिता उपलब्ध करून देण्यात आलेली नव्हती, परंतू माहिती अधिकारी यांचे दि. ३०.०३.२०२२ च्या ई-मेल चे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, ती फाईल उपलब्ध झालेली आहे व त्या फाईलीची पडताळणी दि. ३१.०३.२०२२ ला माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध करून दिलेली आहे. त्या अनुषंगाने, माहिती अर्जातील 'आश्वासित प्रगती योजनेसी' जो मुद्दा निगडीत आहे, त्या विषयीची माहिती, अपिलार्थी यांना या कार्यालयात उपलब्ध असल्यास विनामुल्य उपलब्ध करून देण्यात यावी.

वरिल कारण मिमांसेवरून सदर अपील मंजूर करण्यात येत आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी हे अत्यावश्यक शासकिय कामाच्या संदर्भाने मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली तसेच मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथे कोर्टात हजर राहणे तसेच मा. आयोगाच्या अपिल दाखल करण्याकारीता उपस्थित असल्यामुळे सदरहू अपिल ४५ दिवसात निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

## निर्णय

माहिती अर्जातील 'आश्वासित प्रगती योजनेसी' जो मुद्दा निगडीत आहे, त्या विषयीची माहिती, अपिलार्थी यांना या कार्यालयात उपलब्ध असल्यास विनामुल्य उपलब्ध करून देण्यात यावी.
अपील मंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.

**(अनिलकुमार उके)**
**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**

प्रति,
श्रीमती हेमलता प्रमोद मोती,
ब-१३८/६, वांद्रे शासकीय वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
मो.नं.९७७३९९४४४२.

**(अनिलकुमार उके)**
**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**